**आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा** • राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय विजयी, डीडीएसपी संघ उपविजेता

# कबड्डी स्पर्धेत 'आरएल' कॉलेजची बाजी



### एरंडोल विभागातून १३ संघांचा होता स्पर्धेत सहभाग



आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत रंगलेला सामना.

# राणी लक्ष्मीबाई कॉलेज विजेता तर डीडीएसपी कॉलेज एरंडोल उपविजेता

## मुलींमध्ये पंकज महाविद्यालय विजेता तर एरंडोल उपविजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळा :** आंतरमहाविद्यालयीन एरंडोल विभागीय कबड्डी स्पर्धेत पारोळा येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय विजयी झाले. डीडीएसपी महाविद्यालय एरंडोल उपविजेता ठरले. तसेच मुलींमध्ये पंकज महाविद्यालय, चोपडा विजेता ठरले, तर डीडीएसपी महाविद्यालय एरंडोल हे उपविजेता ठरले. स्पर्धेत एकूण १३ संघांचा सहभाग होता.

पारोळा येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे संचालक व नगरसेवक रोहन मोरे यांच्याहस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. प्रा. जे. बी. पाटील, प्रा. एस. सी. पाटील उपस्थित होते.

यावेळी एरंडोल विभागातील क्रीडा सचिव प्रा. शैलेश पाटील, क्रीडा शिक्षक प्रा. संजय भावसार, डॉ. व्ही. के. पाटील, प्रा. जे. बी. सिसोदिया, प्रा. हर्ष सरदार, डॉ. प्रा. देवदत्त पाटील, प्रा. के. के. वाघ, प्रा. सचिन पाटील उपस्थित होते.

यावेळी एरंडोल विभागातून एरंडोल, बांभोरी, चोपडा, अमळनेर, चाळीसगाव, धरणगाव, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय पारोळा, किसान महाविद्यालय पारोळा, असे मुलांच्या १०, तर मुलींच्या तीन, तर एकूण १३ संघांनी सहभाग घेतला होता.

बाद पद्धतीने सामने खेळविण्यात आले. आता पुढील सामन्याकरिता या संघांमधून विभागीय संघासाठी खेळाडूंची निवड करण्यात येईल.

पंच म्हणून सुरेश महाजन, जितेंद्र गायकवाड, विजय पाटील, अरविंद जाधव, दीपक कोल्हे यांनी कामकाज पाहिले. स्पर्धा यशस्वितेसाठी रोहित महाजन, रोहित अभोरे, मोनाली भोई, अश्विनी जगताप, सोनू नायक, ललित चौधरी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन करून आभार क्रीडा शिक्षक प्रा. संजय भावसार यांनी मानले.

Hello Jalgaon Gramin
Page No. 2 Dec 12, 2021
Powered by: erelego.com

Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist.Jalgaon

Scanned with OKEN Scanner

# आंतर विभागीय मल्लखांब स्पर्धेत एरंडोल विभाग ठरला उपविजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळा : येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयात घेण्यात आलेल्या आंतर विभागीय मल्लखांब स्पर्धेत मुलांच्या संघात नंदुरबार विभाग विजय झाला तर मुलींच्या संघात धुळे संघ विजय झाला आहे. यात मुले व मुलींमध्ये एरंडोल विभाग उपविजेता ठरला.

विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विभागीय मल्लखांब, टांगता मल्लखांब, रोप मल्लखांब या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन येथील प्रशासकीय अधिकारी तथा नगरसेवक रोहन मोरे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक प्रा. डॉ. संजय भावसार, एरंडोल विभागाचे सचिव प्रा. शैलेश पाटील, धुळे विभागाचे सचिव डॉ. नरेश बागल, निवड समिती सदस्य प्रा. बी. बी. बारसे, प्रा. नरेंद्र पाटील, डॉ.भालचंद्र मोरे, आंतरराष्ट्रीय पंच प्रा. भूपेंद्र मालपुरे, राष्ट्रीय पंच प्रा.मालपुरे, प्रा. सरदार, डॉ.देवदत्त पाटील उपस्थित होते.



मल्लखांब स्पर्धेतील थरारक क्षण.
(छाया- राकेश शिंदे)

यावेळी धुळे, जळगाव, नंदुरबार, एरंडोल विभागाचे मुले व मुलींचे संघ सहभागी झाले होते.

मुलांच्या स्पर्धेत नंदुरबार विभाग विजयी झाला, एरंडोल विभाग उपविजेता ठरला, तर मुलींच्या संघात धुळे विभाग विजयी झाला.

या संघांमधून वर्धा येथे विद्यापीठाअंतर्गत होणाऱ्या मल्लखांब स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी दीपक भिल, जयराम महाजन, ऋषिकेश मुळे, तौशिफ लोहार, रोहित आंबोरे, रोहित महाजन, योगेश राठोड, बाळा बिरारी, मोनाली भोई, ललिता चौधरी, अश्विनी जगदाळे, मनीषा कुंभार,सोनू नायक यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जे. बी. पाटील यांनी केले.

Hello Jalgaon Gramin
Page No. 4 Jan 07, 2022
Powered by: erelego.com

Rani Laxmibai Mahavidyalaya
IQAC
PAROLA
Dist.Jalgaon

Scanned with OKEN Scanner

# धर्म • समाज • संस्था

क्रीडा विश्व • पारोळ्यातील स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

# मल्लखांब स्पर्धेत धुळे, नंदुरबार संघाला विजेतेपद

### स्पर्धेसाठी यांनी घेतले परिश्रम



Rani Laxmibai Mahavidyalaya
IQAC
PAROLA
Dist. Jalgaon

Scanned with OKEN Scanner

सकाळ



पारोळा : व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्‌घाटन करताना सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र बागूल, प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय भावसार, प्रा. जे. बी. पाटील आदी.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत धरणगाव, चोपडा विजेते

पारोळा, ता. ८ : येथील राणी लक्ष्मी महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धा झाली. मुलांमध्ये धरणगाव महाविद्यालय, तर मुलींच्या संघांत चोपडा महाविद्यालय विजेते ठरले.

व्हॉलीबॉल स्पर्धेत आठ संघ मुलांचे व पाच मुलींचे, असे एकूण १३ संघ सहभागी झाले होते. चुरशीच्या सामन्यात धरणगाव व चोपडा महाविद्यालय विजेते ठरले. मुलांमध्ये बांभोरी संघ, तर एम. एम. महाविद्यालय पाचोरा उपविजेते ठरले. पंच म्हणून सचिन पाटील, जयेश मासरे, राकेश करोसिया, गुणलेखक म्हणून दर्शन पाटील, तोसिफ लोहार, ऋषिकेश मुळे यांनी काम पाहिले. प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील अध्यक्षस्थानी होते. पारोळा पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक रवींद्र बागूल उद्‌घाटक होते. एरंडोल क्रीडा समितीचे सचिव डॉ. शैलेंद्र पाटील, डॉ. देवदत्त पाटील, प्रा. हर्ष सरदार, प्रा. क्रांती क्षीरसागर, प्रा. जगदीश सिसोदिया, डॉ. सचिन भोसले उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. संजय भावसार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जे. बी. पाटील यांनी आभार मानले. रोहित महाजन, रोहित अंभोरे, दीपक भिल, सुधाकर गाजरे यांनी परिश्रम घेतले.

Jalgaon, Jalgaon-Today
09/12/2021 Page No. 3

Rani Laxmibai Mahavidyalaya
IQAC
PAROLA
Dist.Jalgaon

Scanned with OKEN Scanner